# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक १३/०४/२०२४ (शनिवार) दुपार

---

### नागपूर ग्रामीण पोलीसांचा रूटमार्च

पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत दिनांक १२/४/२०२४ रोजी मा. श्री बापू रोहम साहेब उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल यांचे मार्गदर्शनाखाली श्री कृष्णा तिवारी सहा. पोलीस निरीक्षक ठाणेदार नरखेड यांचे उपस्थितीमध्ये आगामी लोकसभा निवडणूक २०२४ शांततेत पार पडावी या दृष्टिकोनातून रूट मार्च पोलीस ठाणे नरखेड मध्ये – गांधी चौक– बस स्टॅन्ड – जयस्तंभ चौक – आठवडी बाजार चौक, आंबेडकर चौक, मार्केट रोड ते पोलीस स्टेशन नरखेड पर्यंत रूट मार्च घेण्यात आला. तसेच पोलिस स्टेशन नरखेड हद्दीतील ओपी मोवाड हद्दीत मोवाड बस स्टॉप, बाजार चोक, मार्केट लाईन तसेच ओपी सावरगाव हद्दीत सावरगाव बस स्टॉप, मार्केट लाईन, बाजार चौक KGN मशीद, बुध्द विहार, मठ मध्ये रूट मार्च घेण्यात आला असून त्यामध्ये पोलीस ठाणे नरखेड येथील १ अधिकारी १० अंमलदार २८ होमगार्ड व आरपीएफ पथक १ अधिकारी, २१ अंमलदार हजर होते.







पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर